ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

# शासनाच्या बदलत्या धोरणामुळे शासनाच्या जबाबदार्या कमी व नागरी समाजाच्या जबाबदार्या वाढत आहेत " - चिकित्सक वेध

**प्रा.डॉ. संदीप वि. घोडके**

*रयत शिक्षण संस्थेचे, वीर वाजेकर महाविद्यालय, फुंडे नवी मुंबई, (महाराष्ट्र) भारत*

**सारांश**

उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाची प्रक्रिया जशी जोर धरू लागली तशी विविध स्तरावरील शासनाने समाज कल्याण व व्यक्ती विकास यामधील आपली भूमिका मर्यादित करू लागले तसे नागरी समाजाच्या कक्षा अमर्यादित होऊ लागल्या आहेत. समाजातील छोटे मोठे गट , व्यक्ती , संस्था आपल्या परिणे वंचित गटांना वस्तू, सुविधा व सवलती देण्यासाठी सरसावत आहेत. सामाजिक बाधिलकिचे भान वाढत आहे. अशा प्रकारच्या विषय व प्रश्नातून नागरी समाज व्यवस्था मोठ्या प्रमाणात आकारात येत आहेत.

**प्रस्तावना -**

उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाची प्रक्रिया जशी जोर धरू लागली तशी विविध स्तरावरील शासनाने समाज कल्याण व व्यक्ती विकास यामधील आपली भूमिका मर्यादित करू लागले तसे नागरी समाजाच्या कक्षा अमर्यादित होऊ लागल्या आहेत. समाजातील छोटे मोठे गट , व्यक्ती , संस्था आपल्या परिणे वंचित गटांना वस्तू, सुविधा व सवलती देण्यासाठी सरसावत आहेत. सामाजिक बाधिलकिचे भान वाढत आहे. अशा प्रकारच्या विषय व प्रश्नातून नागरी समाज व्यवस्था मोठ्या प्रमाणात आकारात येत आहेत.

**नागरी समाजाची संकल्पना:**

नागरी समाजाची संकल्पना तशी फार जुनी आहेसध्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयावर जोरदार चर्चा सुरू झाली आहे.अनेक राजकीय विचारवंत यांनी या विषयावर चर्चा केली आहे.सिरोसी, लॉक, हेंसेल यांच्या लिखाणात हा विषय आढळतो.रोमन सामाजिक सिसोरोने याचे दोन अवस्थेत चित्रण केले आहे.एका अवस्थेत समाज कायद्यवर आवलंबून असतो तर दुसऱ्या विचारात कायदा अस्थिवात नसतो.पहिल्या अवस्थेत समाजात राजकीय कायदा निर्माण होतो.दुसऱ्या मध्ये नागरी संबंध प्रस्थापित करणे कठीण होते.लॉंक या इंग्रजी तत्वज्ञान मतेनागरी आणि राजकीय समाज महत्त्वाचे असते.नागरी समाजात राजव्यवस्था निर्माण होत असते18व्या शतकात

जर्मन विचारवंत मते समाज नागरी समाज दोन स्वतंत्र संस्था आहेत समाजव्यस्थ्य ही कुटुंब व राज्य स्वंस्था यातील मधली अवस्था आहे.

**समकालीन संकल्पना:**

नागरी समाज या संकल्पनेची निश्चित व्यख्या दिसतं नाही.त्यामुळे नागरी समाजातील चळवळी या व्यख्या नेहमी वापरता येतात.खाजगी व्यक्तींनी वापरलेल्या औपचारीक रचना खाजगी स्वस्था चालवलेल्या स्वस्था यामध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संकल्पना समावेश होतो.या संघटना मानवाचे धोरण प्रभावित करण्याचे प्रयत्न करतात.सामाजिक चळवळी मध्ये गट आणि व्यक्ती विशिष्ट राजकीय उद्देश पूर्ततेसाठी एकत्र येतात त्याना समाज व्यवस्थेत बदल आवश्यक असतो.

नागरी सामाजिक या विशिष्ट घटकांचे स्वरूप विविधपूर्ण आहे. त्यांचे कार्यक्षेत्र कौशल्य हितसंबंध, व्यक्ती, पातळी, उद्देश यात भिन्नता आढळते.

काळदौर याच्या मते"नागरी समाज ही एक प्रक्रिया आहे त्यात व्यक्ती आपोआप आपल्या राजकीय आणि सत्ता केंद्रच्या वाटाघाटी, वाद, संघर्ष किंवा समझोता करतात" .

**नागरी समाजाचे स्वरूप:**

1)नागरी समाज म्हणजे समान उद्दिष्टे पूर्तता साठी निर्माण झालेल्या व्यक्तींच्या समाज संघ.

2)नागरी समाजाचे स्वतंत्र स्थान आहे.

3)नागरी समाजाचे आस्तिव समाजात आहे.

4)नागरी समाज ही लोकशाहीच्या मार्गाने उद्दिष्टे पूर्ण करणारी प्रक्रिया आहे.

**नागरी समाज व सामाजिक चळवळी**

भरतीय लोकशाहीच्या चौकटीत संघटनात्मक राजकारण आणि विरोधात्मक राजकारण नेहमी मुख्य भूमिका बजावली आहे. त्याची मुख्य कारणे म्हणजे संविधानातील कल्याणकारी सामाजिक लोकशाहीचा स्थापनेच्या वचनबद्धता आणि दुसरे म्हणजे वासहतीकरणाचे राजकारण व राष्ट्रीय चळवळी कडून मिळालेला राष्ट्रीय चळवळींचा मूळ गाभा सामाजिक ,आर्थिक बाबतीत असलेला दिसून येतो. स्वातंत्रोत्तर काळानंतर ही सामाजिक चळवळींनी परिवर्तन कार्यक्रमाला उतुंग स्थनावर नेऊन ठेवले आहे. विशेषतः म्हणजे गेल्या दोन दशकात भरतीय राजकारणात परिवर्तनाच्या कार्यक्रमाचे संपूर्ण सीमंतीकरंण झालेले दिसते त्यावर काही मर्यादा आलेल्या दिसतात सम काळात सामाजिक चळवळी पाडाव होत असून त्या स्थास्निक , दुबळ्या व विखुरलेल्या दिसतात.

**सामाजिक चळवळीतून नागरी समाजास गती -**समाजधारने प्रमाणे सामाजिक चळवळी म्हणजे परिवर्तन चळवळी राबविणारा कार्यक्रम होय. राजकीय पक्षांशी संलग्न न राहता ठरावीक परिवर्तन उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेऊन अनेक संघटना कार्यकर्ते विविध क्षेत्रात काम करताना दिसून येतात उदा. आदिवासी, भटके विमुक्त, दलित, भटके विमुक्त शोषित, पीडित वर्ग , भूमी, शेती इ. विषयात विविध सामाजिक

संघटना काम करत आहेत . या गटांनी सामाजिक समजल्या जाणाऱ्या सामाजिक ,आर्थिक विषयांवर लहान लहान भागात काम चालू केले आहे. याचा परिणाम असा झाला की राजकीय पातळीत भक्कम आव्हाने उभी राहिली.राजकारणात मुख्य प्रवाहित शक्तींनी ते संबंध प्रस्थापित करता आले. मागण्यानच्या पूर्ततेसाठी राजकीय पक्षांनी दबाव टाकता आला नाही प्रस्तुत शोधनिबंध प्रकल्पग्रस्तांनच्या चळवळीचा आढावा घेण्यात आला आहे.

**पाणीप्रश्ना संदर्भात आंदोलने -**

पाणीप्रश्न वरून भारतात विविध चळवळी -

**1 )नर्मदा बचाव आंदोलन:**

नर्मदा नदीवर सरदार सरोवर प्रकल्पा विरोधात मेघा पाटणकर यांनी1986 मध्ये आवाज उठविला सरकारने धरणांची उंची वाढविल्यास अनेक गावे पाण्याखाली जाणार तेथील आदिवासी जीवन धोक्यात जाईल गेल्या25 वर्षाच्या काळातील आंदोलनाचा विचार करता केवळ पाटकरांची भिस्त असलेले नर्मदा चळवळ ठरली.

*** बहुजन पर्यावरण वाद:.**

कृष्णा खोरे पाणी चळवळ पश्चिम महाराष्ट्रात काही कार्यकर्त्यांनी कृष्णा खैरे पाणी चळवळ उभारली कोल्हापूर किनि गावात मे1993 ला स्थापना झालेल्या शेतमजूर कष्टकरी संघटना महाराष्ट्रच्या धरण ग्रस्त व प्रकल्प ग्रस्त परिषद आजही,महाराष्ट्र, कर्नाटक,अंधप्रदेश राज्यात कृष्णा नदीच्या पाणी पातळी वरून वाद सुरू आहेत. नर्मदा बचाव व कृष्णा खोरे चळवळ या बरोबर रायगड जिल्ह्यातील पेन तालुक्यातील वरसेई नदीवरील बालगंगा नावाचे धरण आहे. विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात बेंबल जलसिंचन प्रकल्पासाठी63 गाव36 वस्ती जाणार आहेत.

*** पर्यावरण व भूसंपादन संबंधित प्रकल्प:.**

पर्यावरण आणि विकास यांचा संबंध महत्त्व पूर्ण असून सरकारने आखलेल्या विकासात्मक प्रकल्पामुळे पर्यावरणावर त्याचा विपरीत परिणाम होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होईल असा पर्यवरणाचा आक्षेप आहे.

उदा. एन्ररॅंन,जैतापूर अणू प्रकल्प.

आज देशातील वेगवेगळ्या ठिकाणी अक्षरशः अनेक कारणांसाठी सरकार लोकांच्या जमिनी संपादन करीत आहे. त्यात लोक जागृत होत आहेत. देशाच्या भूसंपादन **मुद्यावर वादग्रस्त ठरलेले प्रकल्प:**

1)ओरिसा नियमागिरी परिसरातील वेदांत बहुराष्ट्रीय प्रकल्प

2)कर्नाटक लोह मातीचा उपशचा प्रकल्प.

3)अंधरप्रदेश मधील विशाखापट्टणम येथील उलघणाचा प्रकल्प

4)दिल्ली आग्रा यमुना एक्सप्रेस

5)ओरिसातील प्याप्सीखाण प्रकल्प

6)झारखंड-कर्नाटक मधील मित्तल कंपनी स्टील प्रकल्प.

७) कोकणातील नानार प्रकल्प.

८) रायगड जिल्ह्यातील भूसंपादन व मोबदला त्यावरून आंदोलने.

९) मुंबई येथील आरे काँलनी मेट्रो प्रकल्प.

**जागतिक नागरी समाज उदय:**

जागतिक नागरी समाजाचे राष्टीय सीमा ओलांडून जाणारे स्वातंत्र्य आवश्यक आहे या अवकाश नागरी संघटना स्वयंसेवी संस्था राजकीय वाटाघाटी चर्चा करतात. या स्वयंसेवी संस्थांच्या जागतिक पातळीवर एकमेकांना उत्तम संपूर्ण असतो अनेकदा एकत्रित बेठक होतात जागतिक वातावरण होणारे बदल तापमानात वाढ, मानवी हक्क संरक्षन ,एडस,हे राष्ट सीमा पलीकडले जगला भेडसावणारे प्रश्न आहेत. काही समस्या सर्वांच्या आहेत त्यासाठी सर्वांनी एकत्रित काम केले पाहिजे याची जाणीव जागतिक पातळीवर काम करणाऱ्या संस्था वर दिसून येते.

**जागतिक पातळीवर नागरी समाजाचा विकास -**

विविध देशातील नागरिक समान हक्क व प्रश्नासाठी एकत्र येऊ लागले आहेत. गुलामगिरी विरोधातील चळवळ , वसुंधरा - पर्यावरण संरक्षण, मानवी हक्क मिळवून देण्यासाठी च्या विविध चळवळी ही सर्व जागतिक पातळीवरिल नागरी समाज विकासाचीच उदाहरणे आहेत. दिवसेंदिवस हे संघटन वाढतच जाणार आहे. जनजागृती, तंत्रज्ञानाचा वापर व वैश्विक समस्या निर्माण होणे यामुळे नागरी समाजाचा विस्तार वाढत जात आहे.

नागरी संघटनांकडून पुरविलेल्या जाणाऱ्या सेवा:-

अनेक स्वयंसेवी संस्था जीवनात वस्तूंच्या व सेवांच्या पुरवठयात महत्त्वाचे भूमिका बजावतात.

आशा ठिकाणी या संस्था कार्य करीत आहेत बऱयाच वेळी त्या सरकार बरोबर काम करतात काही स्वयंसेवी संस्था खाजगी कंपन्या बरोबर काम करतात दिसतात

**माहितीचा प्रसार:**

कांंही नागरी संघटना स्वतंत्र नागरी संघटना करून नागरी संघटनांची मते जनतेच्या आणि शासनापुढे मांडतात .पर्यवरणवादी, विकासवादी, स्त्रीवादी, संघटना यामध्ये महत्वाची भूमिका बजावत आहेत.

**संयुक्त राष्ट्र सल्लागार दर्जा:**

संयुक्त राष्टात जाहीर नाम्याच्या 71 व्या कलमा मध्ये आर्थिक आणि सामाजिक संघटना यांमध्ये ठरावात स्वयंसेवी संस्था, संघ सलामती घ्यावी लागते.1950 मध्ये तीन संस्था मान्यता देण्यात आली

1)परिषदेच्या कार्याची थेट संबंध काही मोजक्या स्वंस्था

2)वरिष्ठ क्षेत्रात मान्यता प्राप्त स्वंस्था

3)इतर छोट्या संस्था

1950 पासून सायंसेवी संस्था मोठी भूमिका बजावत आहेत

युध्द क्षेत्रात पेरून ठेवलेली भुसुरंग, आणि पर्यवर्णाचा प्रश्न संबंधित स्वयंसेवी संस्थानि मोठे कार्य केले आहे .विविध क्षेत्रात त्यांचा प्रभाव दिसून येतो.आंतरराष्ट्रीय आर्थीक संस्था आपल्र्यय निर्णय प्रक्रियेत अधिक घटकांना सामावून घेतले पाहिजे अशीही मागणी आहे त्यानी जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे नीतीची स्वतंत्र यंत्रणा उभी केली आहे. सर्व संस्था आपला महत्वाचा दस्तऐवज संकेत स्थळ यावर( website)सर्वांसाठी उपलब्ध करून दिली आहे.

**सारांश** -

जागतिक स्तरावर एल.पी.जी.व्यवस्था प्रचलित झाल्यामुळे सर्व प्रकारच्या शासन व्यवस्थांची भुमिका मर्यादित झाल्या. अनेक समाज कल्याणकारी कार्य सिमित करित आहे . दुसऱ्या बाजूला समाज जागृत होत आहे . आपल्या व समाजाप्रती जबाबदारी ची जाणीव होत आहे. त्यातून समाज उपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. नागरी समाज कल्याणकारि कार्यभाग निभावू लागला आहे. त्यामुळे त्यांच्या जबाबदारी , त्यांच्या वरील अवलंबत्व वाढत आहे. अनेक सेवा संघ, मंडळ, रोटरी कल्ब , छोट्या मोठ्या प्रमाणावर कार्पोरेट कंपन्या सुध्दा समाज विकास योजना आखत आहेत. स्वच्छता अभियान, जलसंधारण, ओला - कोरडा दुष्काळ विषयावर बर्यापैकी कार्य नागरी समाज गट करित आहेत. असे असले तरीही शासनाने आपली जबाबदारी पूर्णपणे झटकून चालणार नाही. कांही समाज घटकांना अद्यापही सरकार शिवाय कोणी वाली नाही.

**संदर्भ-सूची**:

1)व्होरा राजेंद्र आणि सुहास पळशीकर संपा:भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार :2010

2)बाळ प्रकाश -राजकीय व्यवस्था:प्रक्रिया आणि स्वरूप आंबेडकर अकादमी:सातारा 2002

3) महेश भागवत व शुभराज बुवा - समकालीन समस्या.